# प्रतीती

आस्मीता आणि अनिल घाईघाईने ऑफीसला जायला निघाले, आज जरा उशिरच झाला होता. शांतपणे खुर्चीत बसून पेपर वाचत असतांना बाबासाहेब त्यांची ती रोजची धावपळ बघत असायचे. शालीनीताईंची पण दूध, चहा, नास्ता, डब्याची लगबग सुरुच असायची. सकाळी ९ वाजेपर्यंत ही तारेवरची कसरत त्या हसतमुखाने सांभाळत असत. ते दोघे एकदा घरातून बाहेर पडले की, मग कुठे त्यांना जरा उसंत मिळायची. त्यानंतर बाबासाहेबांसोबत गरम गरम चहा-नास्ता आणि थोडा वेळ गप्पागोष्टीत घालवून पुन्हा त्या त्यांच्या दिनचर्येत अडकून जायच्या. बाबासाहेबांना कळायचं आजकाल शालीनीताईंना ही दगदग झेपत नाही. पण मग दिवसभर शांततेने मागेपुढे कामे आवरता येतात, तेवढा आराम पुरतो असं म्हणून त्या बाबासाहेबांची समजूत घालायच्या.

बाबासाहेबांना निवृत्त होवून ३/२ वर्षे झाली होती. त्यांनी त्यांच्या वेळेचे नियोजन बरोबर केले. सकाळी ६:३० उठून-आवरुन मेजरसोबत-मेजर म्हणजे त्यांचा लाडका कुत्रा !! फेरफटका मारुन यायचे. मग अंगणातील बागेत जावून फुलझाडांशी थोडे हितगुज करुन, त्यांच्या अंगाखांद्यावर हात फिरवून घरात यायचे. चहा पिता पिता पेपर वाचन, T V वरील ठळक बातम्या ऐकायचे. मग आस्मीता-अनिलला बाय केल्यावर शालीनीताईंसोबत थोडा वेळ घालवून मग अंघोळ, देवपूजा, आरामशीर जेवण आटोपून दुपारची वामकुक्षी घेत. चहापानानंतर पुन्हा संध्याकाळची फेरी, कट्ट्यावरील मित्रांशी गप्पा करुन निवांतपणे घरी यायचे. तोपर्यंत शालीनीताईपण संध्याकाळी जवळच्या देवळात जावून यायच्या. आस्मीता-अनिल रोज ११ वाजता रात्री घरी यायचे; त्यामुळे क्वचितच घरी जेवायचे. असा छान दिनक्रम सुरु होता दोघांचाही

तब्येतही तशी बरीच होती, अधून-मधून सिझनात थोडफार चालायचं, पण ईश्वरकृपेने दवाखाना मागे लागला नव्हता. मुलगा-सून दोघेही काळजी घ्यायचे पण त्यांना वेळच कमी पडायचा. ते तरी काय करतील?? त्यांच्या मिटींग्ज, प्रोजेक्ट, सतत फोन कॉल्स हेच त्यांचं विश्व बनलं. शनिवार रविवार सुट्टी असायची. सुरवातीला चौघेही घरीच एकत्र जेवण-गप्पा सोबत फिरणे, नाटक सिनेमा यामध्ये वेळ घालवायचे पण आजकाल अस्मिताला आऊटींग आवडायला लागलं. वीकएंड आला की तिचा प्लॅन तयार असायचा - आनंदच्याही कधीकधी मनात नसायचं; पण काही इलाज नव्हता; तिच्या मित्रमैत्रिणींमध्ये त्यालाही जावच लागायचं,

शालिनीताई आवडीने काही खायला करून ठेवायच्या तर तेही आजकाल त्यांना नको असायचे मग त्या बाबासाहेबांकडे तक्रार करायच्या की मी पुढे मन लावून त्यांच्या आवडीचे पदार्थ करते तर दोघेही काही ना काही कारण सांगून खातच नाही; विकतच्या पदार्थांची मात्र डब्यांमधे रेलचेल असते. परवाच होळीला बाईंच्या मदतीने त्यांनी सुंदर पुरणपोळी आणि वडे असा मस्त बेत केला होता. पण अस्मिता म्हणाली, आई, तुम्ही कशाला दगदग करता? नका करत जाऊ, आम्ही आजकाल गोड कमी खातो. ऑफीसमध्ये निमित्ताने खाणं होतंच! तुमच्यासाठी बाहेरून बोलवत जाईन ना, नका मेहनत करत जाऊ!! आनंदही पूर्वीसारखा मोकळेपणे बोलत नव्हता; विचारत नव्हता. एकदम निर्णय घेऊन मोकळा होत होता. दोघांनाही त्यांचं वागणं खटकत होतं. छोट्या छोट्या गोष्टींमध्ये मन दुखावलं जायचं.

त्यांच्या बंगल्याचं नांव 'समाधान' होतं. पण आज त्यांचं समाधान हरवल्यासारखं झालं होतं. बर

AIT Global India Pvt. Ltd.

बाबासाहेबांना मान्य होतं की आजच्या परीस्थितीत मुलांच्या वागण्यात फरक पडणारच; मुलांनाही हौस मौज असते. पण आम्ही कुठे त्यांना अडवतो ?? मग दिलखुलासपणे बोलण, सांगण का हरवतं ?? आपण त्यांच्या मध्ये मध्ये करतो का ?? पुरुषी तटस्थपणे वागणारे बाबासाहेबही आजकाल अस्वस्थ राहु लागले.

आस्मिनाच्या मैत्रिणी घरी आल्या की आधी ती आईशी ओळख करुन द्यायची. पण आजकाल घरी भिसी पार्टि; गेट टु गेदर असले तर आधी आईंना सांगून, मेन्यु वगैरे ठरवायची; ते ही करत नव्हती; त्या आपणहून मैत्रिणींशी बोलायला आल्या की; तिच्या चेहऱ्यावर नाराजी दिसायची; काहीतरी कारण सांगून ती आईंना आत पाठवायची, त्यामुळे आपण घरात कस वागावं हेच त्यांना कळेना !! आस्मिनाच्या मैत्रिणीच सपनाच प्रस्थ आजकाल घरात वाढलं होतं ती मॉडर्न पध्दतीने जीवन जगत होती. तिच्याच प्रभावामुळे आस्मिनाच वागणं बदललं हे आई बाबांच्या लक्षात आलं. रोज रोजचा मनस्ताप टाळण्यासाठी बाबा आईंना म्हणाले, हे बघ, आपण जरा २।३ महीने बाहेर फिरुन येवु. आर्थिकदृष्ट्या मी अजून समर्थ आहे; प्रवासाचे ऑनलाईन बुकींग करु शकतो, मनाला वाटेल तेवढे दिवस एका ठीकाणी राहून मग पुढच्या प्रवासाला जात जावु. तुलाही जरा बदल होईल; हो नाही करता करता शालीनीताई तयार झाल्या.

ठरवल्याप्रमाणे त्यांनी जातांना आस्मीना - अनीलला आपाल्या प्रवास दौऱ्याबद्दल सांगितले. ठीक आहे असं म्हणून दोघांनीही आनंदाने त्यांना निरोप दिला. इकडे आस्मीनाला खुप मोकळ मोकळ वाटु लागलं. अनिलकडेही दुर्लक्ष करुन सुटीच्या दिवशी सपनासोबत बाहेरच जेवण, शॉपिंग, पिक्चर, असं सुरु झालं तिचं !! अनिलही वैतागला -

AII Global India Pvt. Ltd.

स्वयंपाकाच्या कामु लेकेवर येत होत्या म्हणून त्याला लेकेवर जेवायला नशी मिळत होते. एका प्रसंगाकडे त्याचं आणि अस्मिताच खूप भांडण झालं; झालं असं होतं की, सपना प्रेग्नंट होती पण तिला ते मूल नको होतं. त्यामुळे नवऱ्याच्या अपरोक्ष तिने ॲबॉर्शन करवून घेतले. तिची काळजी घेण्यासाठी २ दिवस सुट्टी काढून अस्मिता तिच्या घरी राहयाला गेली होती. सपनाच्या नवऱ्याला सपनाचं वागणं आजिबात पसंत नव्हतं. तो घरात असतांवर अबोल अबोलच राहयचा; आणि ड्युटीवर निघून जायचा.

आस्मिताला आठवलं की, तिचे सासर-माहेरचे नातेवाईक पण आजकाल गुड न्युज कधी देणार असं विचारतं, तेव्हा ती काहीतरी सांगून वेळ मारुन न्यायची. सपनासोबत जेव्हा ती दवाखान्यात होती तेव्हा तिला बरेच पेशंट पाहयाला मिळाले. खरंच, आई होणं सोपं नाही; तिलाही हळूहळू सपनाचा निर्णय चुकीचा वाटू लागला. मातृत्वाच्या सुखाला आपणच आपल्या हाताने पारखे करतो हे लक्षात आले. आणि खरच या दोन दिवसात आपण अनिलची फोनवर चौकशीही केली नाही; त्याबद्दल वाईटही वाटले. आणि ती घरी आली; अनिल तिला पाहताच आज कुठे वाट चुकली? असं म्हणाला आणि मग शब्दाने शब्द वाढतच गेला. तो तसाच ऑफीसला निघून गेला.

आस्मिताला मग एक एक प्रसंग आठवू लागला!! लग्न होवून या घरी आली तेव्हा किती खेळीमेळीचे, उत्साहाचं वातावरण होतं घरच!! आई बाबांच्या निर्मळ प्रेमाला आपण अडथळा समजून बसलो या सपनापायी!! खरच घराच मनस्वास्थ्य माझ्याच अशा बेधुंद वागण्याने बिघडलं!! वाईट संगतीचा परीणाम असा

AIT Global India Pvt. Ltd.

अशा रीतीने वाईटच झाला !! तिला खूपच पश्चात्ताप झाला. आपल्या अशा वागण्याला कंटाळूनच आई बाबा पुतण्याला गेले याबद्दल वाईट वाटले.

रात्री अनिल आल्यावर तिने त्याची क्षमा मागितली. माझ्या निष्काळजीपणामुळे मी तुम्हा तिघांचे जीव दुखावले; खरच मी पुढली दुष्ट आहे का अनिल? असे म्हणून रडू लागली. अनिलने तिची मनःस्थिती समजून घेतली. त्याने आई बाबांना फोन करून आम्हा दोघांनाही तुमची खूप आठवण येते, लवकर परत या. अस्मिता पण मनापासून बोलली आणि मग खरच ८ दिवसात आई बाबा परत आले. पूर्वीची अस्मिता परत मिळाली याचा सगळ्यांना आनंद झाला. आणि पुन्हा हसतखेळत त्यांचे जीवन पूर्ववत सुरू झाले. सपनाच ते एक दुष्ट स्वप्न समजून सगळे विसरून गाडी रुळावर आली यात 'समाधान' मानू लागले.

काही दिवसांनी तुम्ही आजी-आजोबा होणार असल्याची गोड बातमी अस्मिताने दिली !! मग तर काय शालिनीताईंच्या कोडकौतुकात अस्मिता न्हाऊन निघत होती. एक एक महीना कसा भरला ते कळत नव्हते. आणि जेव्हा बाळाचे आगमन झाले तेव्हा तर सुख म्हणजे नक्की काय असतं याची प्रचिती अनुभवायला मिळाली !! आणि अस्मिताला आपले जीवन कृतार्थ झाले असे वाटले !! बाळाच्या बाललीलांमध्ये आजी आजोबाही छान रमले !!

सौ विजया पुरुषोत्तम जोशी.